# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६, २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org Email ID-roaurangabad@dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक**

जा.क्र.विकाऔ/वृसंक्र/३३कोटी/२०१९/2286
दिनांक 16/07/2019

विषय :- ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम सन २०१९
संदर्भ :- मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०१९/वृसंक्र/३३कोटी/कावि/ दिनांक १७.०६.२०१९

या विभागाच्या अधिनस्त सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, दिनांक ०१ जुलै, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीत महाराष्ट्रात ३३ कोटी वृक्ष लागवड करावयाची असुन मराठवाडयात ९.२८ कोटी वृक्ष लागवडीचे लक्षांक शासनाने निर्धारीत केलेला असुन ते पूर्ण करण्यास आपण कटिबध्द आहोत. तंत्रशिक्षण विभागासाठी मराठवाडयाकरिता १,९३,६०० एवढे वृक्ष लागवडीचे व लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्याचे उद्दिष्ट शासनाने दिलेले आहे. वृक्ष लागवड करण्यासाठी खोदलेल्या खड्डयांची माहिती अक्षांश / रेखांशसह वन विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करणे अत्यंत आवश्यक आहे.

याला अनुसरुन प्रत्येक संस्थांना वृक्ष लागवडीचे उद्दिष्टे देण्यात आलेले आहे. त्या उद्दिष्टानुसार अद्यापपर्यंत किती खड्डे खोदण्यात आलेले आहेत. व किती वृक्ष लागवड केलेली आहे याबाबतचा प्रगतीपर अहवाल दर आठवडयाला प्रत्येक गुरुवारी या कार्यालयात सादर करावयाचा आहे.

आपल्या जिल्हातील तंत्रशिक्षणाच्या शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित संस्थेतील वृक्ष लागवडीचे कामावर आपणांस नियंत्रण अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे. सदर नियत्रंण व वेळोवेळी कामाचा प्रगती अहवाल वन विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अपलोड करण्यासाठी आपल्या संस्थेतील जबाबदार अधिका-याची या कामी संकलन अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात यावी व सदर कामाचा प्रगती अहवाल वेळोवेळी वन विभागास ऑनलाईन कळविण्यात यावा. व या कार्यालयात त्याची एक प्रत देण्यात यावी.

आपणांस ठरवून दिलेल्या वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टपूर्ती बाबत कोणतीही अडचण आल्यास आपल्या जिल्हातील विभागीय वन अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. याबाबत आपणाकडुन दिरंगाई / विलंब झाल्यास मा.जिल्हाधिकारी यांचेकडून होणा-या कार्यवाही बाबत आपण जबाबदार रहाल, याची गांभीर्यान नोंद घ्यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने, औषधनिर्माणशास्त्र व अभियांत्रिकी महाविद्यालय,
औरंगाबाद विभाग